International Journal of Advance and Applied Research (IJAAR)
Peer Reviewed Bi-Monthly
ISSN – 2347-7075
Impact Factor – 7.328
Vol.8 No.6 July–August 2021

# धनगर जमातीचे स्वरूप व त्याचे विश्लेषण एक अभ्यास

**डॉ. मनीषा अनंतराव मांजरमकर**
सहयोगी प्राध्यापक,
जवाहरलाल नेहरु समाजकार्य महाविद्यालय व संशोधन केंद्र, नवीन नांदेड.
Corresponding Author: **डॉ. मनीषा अनंतराव मांजरमकर**

**गोषवारा :-**

"धनगर ही जमात महाराष्ट्र शासन निर्णय व वित्त विभागाच्या संमतीने संदर्भ क्रमांक ४९/९० व्यय ११ दि. १७ जानेवारी १९ ९० अन्वये निर्गमित करण्यात आली. महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार शासन निर्णय शिक्षण व समाजकल्याण विभाग क्र. सी.बी.सी. १३६१/म. दि. २१ नोव्हेंबर १९६१ अन्वये मंजूर केलेल्या यादीत सुधारणा करुन विमुक्त जाती व भटक्या जमातीच्या याद्या (सूची) प्रसिध्द केल्या. त्यापैकी भटक्या जमातीच्या यादीत क्र. २९ वर धनगर व त्याच्या पोटजातींचा समावेश करण्यात आला आहे." महाराष्ट्र शासनाकडून मान्य असलेल्या धनगर जमातीतील पोटजाती पुढील प्रामाणे आहेत. "आहिर, डांगे, गटरी, हंडे, तेलवार, हटकर, हाटकर, शेगर, खुटेकर, तेलंगी, तेल्लारी, कोकणी-धनगर, कानडे, वऱ्हाडे-धनगर, झाडे, झेंडे, कुरमार, माहूरे, लाडसे, सनगर, धनवर इ. आहेत."

**बिज संज्ञा :-** विमुक्त जाती व भटक्या जमातीं, धनगर.

**प्रस्तावना :-**

धनगर या शब्दाच्या उत्पत्ती बाबत अनेक विचार आणि मते आहेत. प्रसिध्द मानववंशशास्त्रज्ञ डॉ. भगवानलाल इंद्रजीत म्हणतात की, धनगर हा शब्द धांग या संस्कृत शब्दापासून तयार झालेला असून 'धांग' म्हणजे डोंगर, पर्वत, टेकडी असा आहे. डोंगराळ I प्रदेशात राहणारे ते धनगर शब्दाची उत्पत्ती आहे. आंध्र राजे दक्षिण भारतात नाशिक व अमरावती येथे राज्य करत होते. त्यांच्या राज्याला धनराष्ट्र म्हणजेच धनगरांचे राष्ट्र होय. त्यांच्या नाण्यावर होळकरांच्या राजचिन्हाप्रमाणे गाईचे व सूर्याचे चिन्ह होते. तर एक व्युत्पत्ती 'धनगर झाले' असावे. (रसेल व हिरालाल) याच्या मते उत्तरेकडील गडरिया म्हणजेच मेषपालक जमातीच्या लोकांमध्ये एक 'ढंगर' 'बॅगर' नामक पोटजात आहे. तिचे मूळ महाराष्ट्रातील धनगर समाजात आहे. त्यांना धांगड धांगर असेही

म्हटले जाते. महाराष्ट्रातील सर्वतीय व सह्याद्रीच्या डोंगर रांगात राहणारी एक धनगर जमात म्हणजे 'डांगे' धनगर शब्द आला असावा. असे मत (शंकर तानाजी बुचडे, याच्या धनगर समाजाचे ऐतिहासिक दर्शन) या पुस्तकात मांडले आहे.

**उद्देश :-**

1. महाराष्ट्रातील विमुक्त जाती व भटक्या जमातीचे स्वरूप व विश्लेषण करणे.
2. धनगर समाजाची ऐतिहासिक पार्श्वभूमी अभ्यासणे.
3. धनगर समाजाचे सामाजिक जीवन अभ्यासणे.

**संशोधन पद्धती :-**

प्रस्तुत शोधनिबंधामध्ये द्वितीय स्त्रोतांचा वापर करून शोधनिबंध लेखन करण्यात आले आहे ज्यामध्ये पुस्तके, संदर्भ ग्रंथ, शोधनिबंध, दैनिक लेख, शासकीय अहवाल इ. चा वापर करण्यात आलेला आहे.

**धनगर समाजाची व्याख्या :-**

डॉ. ज्ञानेश्वर गवते, २०११ यांच्या मते 'धन' म्हणजे गाव व गाईचे पालनपोषण करणे म्हणजे धनगर होय. समाजाची विविध ग्रंथात विविध पुस्तकात विविध शास्त्रज्ञांनी विविध व्याख्या केलेली आहे.

1. "गावगाड्या बाहेर उदरनिर्वाहासाठी पशुपालन यावर अवलंबून राहणाऱ्या विशिष्ट सांस्कृतिक जीवन जगणाऱ्या लोकसमूह म्हणजे धनगर होय."
2. "शेळया-मेंढ्यांच्या व्यवसाय करणाऱ्या मूळ मनावंशातील मानवास धनगर म्हणतात."
3. "प्राचीन काळापासून आपल्या शेळया-मेंढ्या पालन व्यवसायाशी एकनिष्ठ राहून वैशिष्ट्यपूर्ण संस्कृती जोपासणे अशा भटक्या समाजाला धनगर समाज म्हणतात."

इंग्रजीमध्ये या शब्दाला Shepherd Society महणतात व जगात Shepherd हा शब्द खुप प्रचलित आहे

**धनगर समाजाची ऐतिहासिक पार्श्वभूमी :**

प्राचीन काळापासून धनगर ही वैशिष्ट्यपूर्ण जमात आहे. असे अनेक उदाहरणे आपल्या समोर मांडता येतील. या देशातील अतिप्राचीन जमात असून भारतातील मूळ निवासी म्हणजेच आदिवासी आहे. 'हडप्पा मोहंजदाडो' या नावाने ओळखले जाणारे भारतीय प्राचीन सिंधू संस्कृतीचे जनक देखील धनगरच आहे. धनगर यांनी निर्माण केलेल्या सिधू संस्कृतीचा कालखंड इ.स.पू. सत्ताविसशे ते पंधराशे असा समजला जातो. हीच संस्कृती जगातील सर्वात प्राचीन संस्कृती, ती समाजातील या संस्कृतीचे रुपांतर 'नगरात', 'शहरात' झालेले असल्यामुळे

तिला 'नागर संस्कृती' असे देखील म्हणतात. ही संस्कृती, स्त्रीप्रधान संस्कृती होती व मातृसत्ताक पध्दतीवर आधारलेली होती.

ही संस्कृती निसर्गपूजक होतो. या संस्कृतीला लोक सूर्य, जल, अग्नी, वृक्ष यांची पूजा करतात. तसेच पशु, पक्षी, नाग, वृषभ, बेल यांची पूजा करतात. हेच त्यांचे देव व दैवत होती. सिंधू नदीच्या उत्खननात एकही देवाचे मंदिर आढळले नाही. (होमेश भुजाडे, २०१४) महाराष्ट्राचा पुरातन इतिहास बघितला तर दोन ते अडीच लाख वर्षापूर्वी या ठिकाणी मानवाचे आगमन झाले. त्यावेळी तापी, कृष्णा, गोदावरी नदीच्या कडेला मानवाचे वास्तव्य होऊ लागले. जीवन जगण्यासाठी पशुपालन करुन मानव त्याचा उदरनिर्वाह करु लागला. चार हजार वर्षापूर्वी महाराष्ट्रात पशुपालन युग सुरु झाले. त्यात शेळया-मेंढ्या, गाई-म्हशी, तिरर पक्षी, कांवड्या इत्यादी घेऊन मानव पशुपालन करु लागला. आणि महाराष्ट्राचा भाग तसारणाऱ्या शास्त्रज्ञांच्या मते, धनगर जमात अति प्राचीन काळापासून भारताच्या विधि तांमध्ये आढळून येते प्रांतानुसार वेगवेगळया नावाने ही जात ओळखली जाते.

**प्रांतानुसार वेगवेगळया नावाने धनगर जमातीची ओळख :-**

मध्यपूर्व भागातील अफ्रिकामध्ये पशुपालकांचा प्रभाव जास्त प्रमाणात दिसून येते. भारतात अश्मयुगाच्या उत्तरार्धात म्हणजे इ.स.पू. १५०० च्या दरम्यान समाजाविषयी पहिली नोंद मिळते. प्रादेशिक महत्त्व असलेल्या जाती जमाती मध्ये भारतात धनगर जमात अशा प्रकारे दिसून येतो. डोंगराळ प्रदेशात राना वनात दऱ्या खोऱ्यात तळ ठोकलेल्या धर्मभोळया, काटक व या कष्टाळू जमातीला धरतीची लेकरे म्हणून ओळखले जाते. प्राचीन लोककथा व लोकवांग्मयमधून समाजाच्या अस्तित्त्वाच्या खुणा आढळतात. शिव व शंकरापासून धनगर समाजाची उत्पत्ती झाली असे म्हणतात. मानववंशशास्त्राच्या अभ्यास करणाऱ्या शास्त्रज्ञांच्या मते, धनगर जमात अति प्राचीन काळापासून भारताच्या विधि प्रांतांमध्ये आढळून येते प्रांतानुसार वेगवेगळया नावाने ही जात ओळखली जाते.

**प्रांतानुसार वेगवेगळया नावाने धनगर जमातीची ओळख**

| अ.क्र. | प्रदेशाचे नाव | समाजाचे नाव |
|---|---|---|
| १ | महाराष्ट्र | धनगर |
| २ | मध्य प्रदेश | धनगर |
| ३ | आंध्रप्रदेश | गोल्लाज |
| ४ | तमिळनाडू | गाडीयार, कुरबार |

| | | |
|---|---|---|
| ५ | पंजाब | गुड्डी, गढरिया. |
| ६ | गुजरात | बारवाडरु |
| ७ | राजस्थान | पाल क्षत्रिय |
| ८ | कर्नाटक | कुरुबरू |

स्त्रोत: पाटील तानाजी, २०१४, धनगरी ओवी गीतांचा चिकित्सक अभ्यास

**सामाजिक जीवन :-**

धनगर समाजाची कुलदेवता म्हणून मायाक्का देवीची पूजा केली जाते. भिवाई देवी आणि खंडोबा यांचीही पूजा केली जाते. त्यांचे धार्मिक विश्वास प्रामुख्याने निसर्गावर आधारित आहेत धनगर समाजाची समाजिक रचना बघताना धनगर समाजात कुळ, गोत्र आणि पंचायत या संस्थांचे महत्त्व आहे. कुळ आणि गोत्र ही रक्तसंबंध दर्शवतात तर पंचायत ही समाजातील वादविवाद सोडवण्याचे काम करते धनगर समाजात विवाह हे एक पवित्र बंधन मानले जाते विवाह सोहळे पारंपरिक पद्धतीने साजरे केले जातात धनगर समाजात अनेक उत्सव साजरे केले जातात. दसरा, दिवाळी, होळी यासारखे राष्ट्रीय उत्सव तर मायाक्का जत्रा, भिवाई जत्रा यासारखे धार्मिक उत्सवही साजरे केले जातात धनगर महिलांचा पोशाख हा त्यांच्या सौंदर्याचे प्रतीक आहे. त्या रंगीबेरंगी साड्या आणि नक्षीकाम केलेले कपडे घालतात. पुरुषांचा पोशाख साधा असतो धनगर समाजाची कला आणि संस्कृती ही त्यांच्या जीवनाचा एक महत्त्वपूर्ण भाग आहे. लोकगीते, लोकनृत्ये, लोककथा यांच्यामध्ये त्यांची संस्कृती दिसून येते.

**निष्कर्ष :-**

धनगर जमातीला भटक्या जमातीच्या यादीत समावेश करण्यात आलेले आहे त्याचबरोबर त्यांच्या पोट जातीचा स्पष्ट उल्लेख केलेला दिसून येतो धनगर समाजाची ऐतिहासिक पार्श्वभूमीचे अध्ययन करत असताना महाराष्ट्रातील पशुआधारित व्यवसाय व त्याचबरोबर विशिष्ट सांस्कृतिक जीवन व व्यवसायासाठी सतत स्थलांतरित करत राहणारा समाज म्हणून या धनगर समाजाला ओळखले जाते. धनगर समाजातील वादविवाद पंचायतीमार्फत सोडवल्या जातात धनगर समाजाची कला आणि संस्कृती ही त्यांच्या जीवनाचा एक महत्त्वपूर्ण भाग आहे.

**संदर्भ सूची :-**


1. 'कारीकंटे गणपत रामराव (२०१६) मराठवाड्यातील पंचायतराज संस्थेत भटक्या विमुक्त जाती जमातीचा राजकीय सहभाग-एक अभ्यास', नांदेड अप्रकाशित पीएच.डी. प्रबंध, स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड.
2. गोरे नवनाथ (२०१८) फेसाटी, पुणे अक्षर वाङ्ग्मय प्रकाशन.
3. जाधव काशीराम कंठीराम, (२०१४), 'घुमन्तु जनाजातियो के लोकगीतो का सांस्कृतिक अध्ययन', औरंगाबाद अप्रकाशित पीएच.डी. प्रबंध, डॉ.बा.आ.म.वि. औरंगाबाद.
4. देशमुख भास्कर गुलाबराव (२०१६) 'मसनजोगी भटक्या जमातीचे समाजशास्त्रीय अध्ययन' (विशेष संदर्भः नांदेड जिल्हा), नदिड अप्रकाशित पीएच.डी. प्रबंध, स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड.
5. धनगर जगतराव, (२०१५), 'धनगर जमातीतील रुढी परंपरांचा अभ्यास', जळगाव : संपा. डॉ. देसाई संभाजी, ग्रामीण समाजःकाल, आज व उद्या, प्रशांत पब्लिकेशन्स, जळगाव, प्रथम आवृत्ती
6. बोरसे कैलास भटा, (२०१६) 'उत्तर महाराष्ट्रातील धनगर समाजाच्या सामाजिक स्थितीचे अध्ययन, अमरावती अप्रकाशित पीएच.डी. प्रबंध, संत गाडगेबाचा अमरावती विद्यापीठ, अमरावती.
7. https://divyamarathi.bhaskar.com/news/dhangar-community-survey-report-handed-over-to-the-government-5954789.html?form=MG0AV3
8. https://www.esakal.com/mumbai/dhangar-reservation-report-should-accept-today-by-government-otherwise-prakash-shendge-gives-serious-warning-aau85?form=MG0AV3